
# वेडं कोकरू



वेडं कोकरू खूप थकलं
येताना घरी वाट चुकलं

अंधार बघून भलतच भ्यालं
दमून दमून झोपेला आलं



शेवटी एकदा घर दिसलं
वेडं कोकरू गोड हसलं

डोकं ठेवून गवताच्या उशीत
हळूच शिरलं आईच्या कुशीत

**– मंगेश पाडगावकर**

66VJRS

## क्ष ज्ञ अ अॅ ऑ अं अः



गिरव, लिही, वाच.

**क्ष**

क्ष

क्षण क्षमा क्षितिज पक्षी बक्षीस

**ज्ञ**

ज्ञ

यज्ञ ज्ञान आज्ञा विज्ञान ज्ञानदेव

---

**अ**

अ

अभय अकरा अळी अजून अगोदर

**अॅ**

अॅ

बॅट सॅक हॅट कॅमेरा बॅटरी

**ऑ**

ऑ

कॉट बॉल गॉगल सॉस मॉल

**अं**

अं

अंगण अंगठी अंक अंजीर अंगरखा

**अः**

अः

स्वतः दुःख शतशः उषःकाल अंशतः

◉ **शब्दातील पहिल्या अक्षरावर अनुस्वार दे. शब्द पुन्हा लिही, वाच.**

जसे – (१) सोड  सोंड.................. (२) नदी ....................

(३) माडी .................... (४) आबा ....................

(५) थडी .................... (६) साग ....................

(७) कुडी .................... (८) वदन ....................

● **कंसातील योग्य स्वरचिन्हांचा वापर करून शब्द तयार कर.**

( ा ि ी ु ू े ै ो ौ ं )

| | | |
|---|---|---|
| बा ह ली | सा म स म | स म वा र |
| म दा न | प ठ णी | भ गो ल |
| पा ल ख | ए ट दा र | स नि क |
| ट क ली | प च का री | अ ळ ख |
| ह द | द प र | स ध्या का ळ |

675FTF

## • घटनाक्रम लाव.

| | | |
|---|---|---|
| पाने आली, फुले आली. | (१) | ........................................ |
| कोंब फुटले. | (२) | ........................................ |
| झाडाला फळे आली. | (३) | ........................................ |
| पाणी घातले. | (४) | ........................................ |
| बी रुजवले. | (५) | ........................................ |
| रोप वाढले. | (६) | ........................................ |

## ◉ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भर.

(घे, दे, ये, जा, घे, आण)

(१) इरा हे पैसे .................... .

(२) बाजारात .................... .

(३) बाजारातून भेंडी, टोमॅटो .................... .

(४) पैसे मोजून .................... .

(५) उरलेले पैसे परत .................... .

(६) घरी लवकर परत .................... .

# जोडाक्षरे

* बघ, ऐक, वाच.

त्‌ या
त्‌ या
**त्या**
होत्या
आत्या
पणत्या

च्‌ या
च्‌ या
**च्या**
मिरच्या
गावाच्या
नावाच्या

स्‌ त
स्‌ त
**स्त**
मस्तक
पुस्तक
जास्त

* गोलातील अक्षराला गोलाबाहेरील अक्षर जोडून शब्द तयार कर.

ह
स कि
प **ल्ला** बि
ग छ
खा

सल्ला

.................... .................... .................... ....................
.................... .................... .................... ....................

.................... .................... .................... ....................
.................... .................... .................... ....................

67EBV3



# वाचनपाठ ४

- वाच.



(१) आकाश निळे दिसत होते.

(२) जोराचा वारा सुटला होता.

(३) मुलांनी पतंग उडवायचे ठरवले.

(४) कैवल्यने पतंगाचे सामान आणले.

(५) अक्षताने पतंग बनवले.

(६) सगळे पतंग उडवण्यासाठी मैदानावर आले.


(७) ॲना पतंग उडवत होती.

(८) ज्ञानेशने मांजा धरला होता.

(९) आकाशात रंगीबेरंगी पतंग दिसत होते.

(१०) पतंग उडवून मुलांना मजा आली.

- चित्रे बघ. गोष्ट तयार कर. सांग.

67N7HQ